MHAU100001322026

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३/२०२५ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश</u>**

*( भारती इतर वि. शासन )*

**०१.** अर्जदारांनी अर्ज वारस प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ प्रमाणे (Heirship Certificate) मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे अप्पासाहेब नामदेव सोनवणे यांचे दि.१८/०३/२०१८ रोजी निधन झाले आहे. मयत अप्पासाहेब हे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील आहे. अर्जदारांनी प्रतिज्ञापत्र दाखल करुन त्यांचे पुरावा प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे नमुद केले आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार यांचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.७ अभिलेखावर दाखल केले असुन त्यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. मयत अप्पासाहेब नामदेव सोनवणे वर मृत्यु प्रमाणपत्राची प्रत व अर्जदारांच्या आधारकार्डांची प्रती वर इ. दस्त यादी सोबत दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र नि.क्र.०६ वर "लोकपत्र” मध्ये दि.०८/०३/२०२५ रोजीच्या अंकात कागदपत्रांच्या यादीसोबत जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच अर्जदार यांनी पुरसिस नि.०८ दाखल करुन पुरावा बंद केला आहे. अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे, अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केल्याप्रमाणे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी अन्य कुणीही आक्षेप घेतला नाही.

**०४.** वरील पुरावा व कागदपत्रांच्या आधारे अर्जदार हे मयत अप्पासाहेब नामदेव

सोनवणे यांचे मृत्यु पश्चात त्यांचे वारसदार आहेत असे दिसते. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे ते मयत अप्पासाहेब नामदेव सोनवणे यांचे वारस असल्याचे दिसुन येत असल्याने ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होईल, म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत अप्पासाहेब नामदेव सोनवणे यांचे वारस असल्याबाबत त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक/शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा.

४. अर्ज निकाली काढण्यात येतो.

MASEERA ABDUL KHALID SHAIKH

Digitally signed by MASEERA ABDUL KHALID SHAIKH
Date: 2026.07.30 16:20:53 +0530

**(एम.ए.के.शेख)**

**दिनांकः ३०/०७/२०२६**

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खुलताबाद.